## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १८१ वा | गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# पोस्ट आधी, घटना नंतर! अजित पवारांच्या मृत्यूपूर्वीची भाजप समर्थक ट्रोलरची 'हादरा' पोस्ट चर्चेत; रोहित पवारांचा भाजप-फडणवीसांवर निशाणा

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** बारामती येथे झालेल्या विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्यानंतर राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. अपघातानंतर ब्लॅक बॉक्स जळाल्याची माहिती समोर आल्यानंतर संशय अधिक गडद झाला असून, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी तिसऱ्यांदा पत्रकार परिषद घेत गंभीर आरोप केले.

### ब्लॅक बॉक्स जळाल्याने संशय वाढला

विमान अपघात तपासादरम्यान ब्लॅक बॉक्स नुकसानग्रस्त झाल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर रोहित पवार म्हणाले, 'दादांच्या अपघाताला २२ दिवस उलटले, तरी प्राथमिक अहवाल नाही. काहीतरी द्यायचं म्हणून माहिती समोर आणली जाते; त्यातही विमानाचे मॉडेल चुकीचे सांगितले जाते. हा प्रकार गंभीर आहे.'

### 'घटना आधी पोस्ट कशी?' - संशयाची ठिणगी

रोहित पवार यांनी 'समित ठक्कर' नावाच्या सोशल मीडिया वापरकर्त्याचा उल्लेख करत मोठा आरोप केला. अपघाताच्या दोन दिवस आधी 'महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप होणार' असे ट्विट संबंधित व्यक्तीने केले आणि अवघ्या सात मिनिटांत ते डिलिट केल्याचा दावा त्यांनी केला. 'घटना होण्यापूर्वी अशा प्रकारची पोस्ट कशी येते? आणि ती तात्काळ का हटवली जाते?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. 'तोच व्यक्ती आता मला ट्रोल करत आहे. हा भाजपचा ट्रोलर आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घ्यावी,' अशी मागणी रोहित पवार यांनी केली.




### व्हीएसआर कंपनीवर प्रश्नचिन्ह

अपघातग्रस्त विमान चालवणाऱ्या कंपनीवरही त्यांनी संशय व्यक्त केला. 'व्हीएसआर कंपनी अडचणीत येऊ नये म्हणून कागदपत्रे तयार केली जात आहेत का? अपघातामागील सूत्रधारांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे का?' असा थेट आरोप त्यांनी केला.

तपास यंत्रणांचा वेग संथ असल्याचा आरोप करत त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, 'सत्ता आणि यंत्रणा हाताशी असताना तपास इतका संथ का? कुठल्याही पदाविना मी माहिती गोळा करू शकतो, मग अधिकृत यंत्रणांना एवढा वेळ का?'

### ट्रोलिंगमागे 'माहितीचा गैरवापर'?

रोहित पवार यांनी दावा केला की, खासगी विमान प्रवासासंदर्भातील प्रशासनाला दिलेली माहिती ट्रोलर्सकडे कशी पोहोचते? 'ही माहिती कोण देतं? प्रशासनातील कोणीतरी माहिती लीक करत आहे का?' असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी संताप व्यक्त केला. 'मला वेडं ठरवण्याचा प्रयत्न केला जातोय. पण मी दादांच्या मृत्यूमागचं सत्य शोधल्याशिवाय थांबणार नाही. महाराष्ट्रातील स्वाभिमानी नागरिकही निष्पक्ष चौकशीची मागणी करत आहेत,' असे ते म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांकडे कारवाईची मागणी

या संपूर्ण प्रकरणात सोशल मीडिया पोस्ट, ब्लॅक बॉक्स, तांत्रिक अहवाल आणि संभाव्य राजकीय दुवे यांची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लक्ष घालून संबंधितांवर कारवाई करावी, अशी भूमिका रोहित पवार यांनी मांडली. दरम्यान, १७ फेब्रुवारी रोजी नागरी उड्डाण मंत्रालय यांनी अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स अंशतः जळाल्याची माहिती दिली. या निवेदनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत पवार म्हणाले की, 'ब्लॅक बॉक्स ११०० अंश सेल्सिअस तापमानातही सुरक्षित राहण्यासाठी तयार केला जातो. मग तो जळाला कसा? स्फोट काही सेकंदांचा असतो. विमानाची ॲल्युमिनियम बॉडी ६३५ अंशांवर वितळू शकते; मात्र ब्लॅक बॉक्स संरक्षित भागात असतो. त्यामुळे मंत्रालयाची माहिती संशयास्पद वाटते.'

### अतिरिक्त इंधनटाकी व स्फोटाचा मुद्दा

पवार यांनी सांगितले की, विमान रनवेवर न पडता बाजूला कोसळले. त्यामुळे वेग तुलनेने कमी असताना एवढा मोठा स्फोट कसा झाला? 'विमानात अतिरिक्त फ्युएल टँक बसवले होते. टॉयलेटजवळील या टँकच्या मागेच ब्लॅक बॉक्स असतो. जादा इंधनामुळे स्फोट तीव्र झाला असावा,' अशी शंका त्यांनी व्यक्त केली. बारामतीला जाण्यासाठी इतके इंधन भरण्याची गरज नव्हती. पुणे, मुंबई किंवा अन्य विमानतळावर लँडिंगची शक्यता असताना बारामतीलाच उतरण्याचा प्रयत्न का केला? फ्लाइट प्लॅनमध्ये फेरफार झाला का? अशी विचारणा त्यांनी केली. तसेच, हा फ्लाइट प्लॅन DGCA ला कळवण्यात आला नव्हता, असा आरोपही त्यांनी केला.

### विमा रक्कम व पायलटची भूमिका

अपघातग्रस्त विमानाची सध्याची बाजार किंमत १०-१५ कोटींच्या दरम्यान असताना विमा रक्कम ५५ कोटी आणि लायबिलिटी इन्शुरन्स २१० कोटी असल्याचा दावा पवार यांनी केला. 'या आर्थिक बाबींची माहिती पायलटला होती का?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. बीए (ब्रीथ अनालायझर) चाचणीचे व्हिडिओ सार्वजनिक करावेत, अशी मागणी करत पवार म्हणाले की, संबंधित कंपनीच्या यंत्रणेत तारखा बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे कागदपत्रांऐवजी सीसीटीव्ही व ई-मेल पुरावे तपासावेत.

### तांत्रिक त्रुटी आणि मॉडेल गोंधळ

अपघातग्रस्त विमान लेअरजेट ४५ एक्सआर असल्याचे सांगितले जात असताना मंत्रालयाने लेअरजेट ४५ संदर्भात माहिती (पान 2 वर..)

# 'शिवजन्मोत्सवाचा उत्साह, शहर शिवमय' 'आज उगवला सूर्य नभी नव्या नवलाईचा...'

## 'न भूतो न भविष्यती' असा राज्यातला एकमेव देखणा कार्यक्रम

## हजारो महिला पारंपरिक वेशभूषा परिधान करून हजर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आज उगवला सूर्य नभी नव्या नवलाईचा....' हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माचा पाळणा गात हजारो सोलापूरकर शिवभक्त महिलांनी बुधवारी रात्री बारा वाजता ह्यन भूतो न भविष्यतीह्न असा शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करून आपल्या लाडक्या राजाला मानवंदना दिली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आजवर अनेक कार्यक्रम झाले. परंतु, मंगळवारी रात्री झालेल्या शिवजन्मोत्सव सोहळ्याने नवा इतिहास घडवला. रात्री दहा वाजण्याच्या सुमाराला छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवभक्तांची दाटी झाली होती. पाळणा सादरीकरणाचे यंदाचे हे पाचवे वर्ष आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांची गर्दी झाली होती. छत्रपतीं शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँड पासून ही गर्दी पुणे नाक्यापर्यंत गेली होती. तर इकडे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नवी पोलीस चौकी पर्यंत महिलांची गर्दी होती.

या गर्दीतून जय जिजाऊ, जय शिवरायचा जयघोष होत होता. शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ राजमाता जिजाऊंचा पुतळा ठेवण्यात आला होता. या पुतळ्याच्या अगदी समोरच




सजवून ठेवलेला पाळणा होता. त्यात बाळशिवबांची मूर्ती होती. दूरूनच या पाळण्याचे छायाचित्र टिपण्यासाठी महिलांची धडपड सुरू होती.

रात्री १२ वाजता 'झुलवा पाळणा.. पाळणा बाळ शिवाजीचा' हे पाळणा गीत सुरू झाले आणि हजारो महिला, शिवभक्तांनी जल्लोष केला. ज्या क्षणाची सर्व जण वाट पाहत होते तो पाळण्याचा कार्यक्रम सुरू झाला. जमलेल्या महिला, मुले टाळ्या वाजवीत पाळण्याच्या गीताला दाद देऊ लागली. फुले उधळू लागली. आकाशात फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली. 'जय जिजाऊ-जय शिवराय', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'चा जयघोष गगनात दुमदुमला. हवेत भगवा झेंडा गरगर फिरला आणि पुन्हा जय शिवरायचा जयघोष झाला.

गुलाब पाकळ्यांची उधळण अन फटाक्यांची आतषबाजी सुरूच होती. पाळणा झाल्याबरोबर उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर गुलाब पाकळ्यांचा वर्षाव केला. हर हर महादेव, जय शिवाजी, जय भवानीच्या घोषणा सुरू झाल्या. फटाक्यांच्या आतषबाजीने आकाश दुमदुमून गेले. डोळ्यांचे पारणे फिटणारा शिवजन्मोत्सव सोहळा पाहून अनेकांनी संयोजकांचे कौतुक केले. उपस्थितांना लाडू वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. शिवजन्मोत्सव सोहळा झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करून सर्वजण अत्यंत शिस्तबद्धपणे घराकडे परतले. सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त होता. पण कार्यक्रमाचे नियोजन स्वयंसेवकांनी केले. अत्यंत शिस्तबद्ध व शांततेत हा सोहळा पार पडला. (पान 2 वर..)













## संपादकीय

# निर्ढावलेपणाचा कळस

दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ज्या दिवशी निधन झाले, त्याच दिवशी त्यांच्या खात्यामार्फत राज्यातील विविध संस्थांच्या शाळांना अल्पसंख्याकांचा दर्जा देण्याची मंजुरी दिली गेल्याचा प्रकार उघडकीला आला आहे.

अजित पवार यांचे 28 जानेवारीला निधन झाले आणि त्याच दिवशी या शाळांना अल्पसंख्याक प्रमाणपत्र मंजुरीचे पत्र दिले गेले. त्या दिवसापासून पुढील तीन दिवसांत राज्यातल्या 75 शाळांना असा अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आल्याचा प्रकार उघडकीला आला आहे. या अत्यंत धक्कादायक प्रकारामुळे सगळेच जण थक्क झाले आहेत. शासकीय व्यवस्थेत गलथानपणा असतो हे आपण वारंवार पाहतो, त्यात भ्रष्टाचारही चालतो याचीही सगळ्यांना कल्पना आहे. पण या व्यवस्थेत एखाद्या मंत्र्याचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा लाभ घेत तातडीने त्या मंत्र्याच्या खात्यातील फायली गुपचूप मंजूर करण्याचा संधीसाधूपणसुद्धा असतो हे या राज्याला पहिल्यांदाच अनुभवायला मिळाले आहे. ज्या अल्पसंख्याक मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांकडून ही मंजुरी दिली गेली त्या मंत्रालयाचा कारभार अजित पवार यांच्याकडेच होता. विशेष म्हणजे ज्या दिवशी अजित पवार यांचे निधन झाले त्या दिवशीचे कामकाज दुखवट्यामुळे बंद ठेवण्यात आले असतानाही या फायली मंजूर करण्यात आल्या हे आणखीनच धक्कादायक. आता या 75 शाळांना अल्पसंख्यांक म्हणून जी मंजुरी दिली गेली आहे त्याला नव्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून स्थगिती देण्यात आली असून त्यांच्या चौकशीचाही आदेश देण्यात आला आहे. एखाद्या घोटाळ्याचे प्रकरण उघडकीला आल्यानंतर त्याला स्थगिती देणे किंवा चौकशीचा आदेश देणे ही वरवरची उपाययोजना झाली. एका अर्थाने तो केवळ एक औपचारिकपणा झाला, पण आता हा विषय एवढ्या पुरता मर्यादित राहता कामा नये. हा गंभीर प्रकार करणारे जे कोणी अधिकारी असतील त्यांच्यावर याच तत्परतेने निलंबनाची आणि त्यानंतर बडतर्फीची कारवाई व्हायला हवी. काँग्रेस पक्षाने तर या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांना मोका लावण्याची मागणी केली आहे, खरं म्हणजे या मागणीचासुद्धा आता विचार करायला हरकत नाही इतका हा मामला गंभीर आहे.

हे प्रकरण अत्यंत रंजकही आहे. याआधी माणिकराव कोकाटे नावाच्या मंत्र्यांकडे अल्पसंख्यांक विभाग होता. त्यांनी या शाळांच्या अल्पसंख्यांक दर्जा देण्याच्या प्रस्तावांना यापूर्वीच स्थगिती दिली होती. पण दरम्यानच्या काळात त्यांचे मंत्रिपद गेले आणि या मंत्रालयाचा कारभार अजित पवार यांच्याकडे आला. त्यामुळे या प्रस्तावांच्या मंजुरीसाठीच्या फायली अजित पवार यांच्याकडे प्रलंबित होत्या.

ते हयात असताना यावर निर्णय होण्याच्या आधीच दुर्दैवाने काळाने त्यांच्यावर घाला घातला, पण शासकीय व्यवस्थेतील घोटाळेबाज अधिकारी अशा संधीचाही फायदा घेण्यासाठी किती टपलेले असतात याचे प्रत्यक्ष प्रमाण या निमित्ताने पाहायला मिळाले. एखाद्या शाळेला अल्पसंख्यांक म्हणून दर्जा मिळाला तर त्या शाळेला किंवा त्या शिक्षण संस्थेला अनेक प्रकारच्या शासकीय सवलती मिळतात. मुख्य म्हणजे या शाळांतील प्रवेशाला शिक्षण अधिकार कायदा लागू होत नाही, त्यामुळे प्रवेश देताना भरमसाठ देणग्या आणि पैसे वसुलीचे अधिकार या शाळांना मिळू शकतात.

त्याखेरीज माहिती अधिकार क्षेत्रातूनही या शाळांना वगळले जाते त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्याची संधी उपलब्ध होते, यासाठीच हा दर्जा मिळवण्यासाठी संस्थाचालक आटापिटा करत असतात. मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी हे या भ्रष्टाचार साखळीतले महत्त्वाचे दुवे आहेत. लोकप्रतिनिधी किंवा कुठल्याही राजकीय पक्षाच्या सरकारने भ्रष्टाचाराच्या प्रकारांना आळा घालण्याच्या कितीही गावगप्पा केल्या तरी जोपर्यंत व्यवस्थेतील या भ्रष्ट अधिकाऱ्यांना चाप लागत नाही तोपर्यंत कुठल्याच पातळीवरील भ्रष्टाचाराला आळा घातला जाणार नाही हे लक्षात घेण्याची गरज आहे. या सगळ्या प्रकरणाचा ठपका किंवा जबाबदारी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावरसुद्धा जाते. त्यांचा प्रत्यक्ष या प्रकरणाशी काही संबंध नसला तरी राज्याचे प्रमुख म्हणून मंत्रालय व्यवस्थेतील भ्रष्टाचाराच्या या गंभीर प्रकाराची त्यांना दखल घ्यावीच लागेल, त्यामुळे त्यांना या प्रकारातून आपले अंग झटकता येणार नाही. अजित पवार यांच्या पदाची जबाबदारी आता सुनेत्रा पवार यांच्यावर आली आहे. त्यांना प्रत्यक्ष शासकीय कामाचा तसेच मंत्रिपदाचा थेट अनुभव नाही. आपल्या पतीच्या कार्यकाळात त्यांना या सरकारी कार्यपद्धतीची चांगली तोंडओळख नक्कीच असणार.

तसेच अगदी अलीकडच्या काळात त्यांना राज्यसभेचे खासदारही केले होते त्यामुळे तेथीलही थोडाफार अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे त्या सरकारी कामकाजाविषयी फार अनभिज्ञ असतील असे म्हणता येत नाही, हे जरी खरं असले तरी वरील प्रकार लक्षात घेता शासकीय व्यवस्थेतील भ्रष्ट यंत्रणा किती तत्परतेने आपला डाव साधण्यासाठी सिद्ध असते हे त्यांना लक्षात घ्यावे लागेल. त्यामुळे उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळताना या भ्रष्ट यंत्रणेवर आणि अधिकाऱ्यांवर त्यांना नियंत्रण ठेवावे लागेल. किंबहुना या व्यवस्थेची पावले ओळखून सुनेत्रा पवारांना चाणाक्षपणा बाळगावा लागेल. प्रत्यक्ष राजकारण चालवताना जे डावपेच आखावे लागतात त्यात त्यांना मदत करण्यासाठी त्यांच्या पक्षात अनेक धुरंदर नेते आहेत. पण प्रशासनातल्या या भयकर प्रकारांना आळा घालण्यासाठी मात्र सुनेत्रा पवारांना स्वतःचेच कसब वापरावे लागेल.

# छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक

भारतीय इतिहासाच्या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थान केवळ एका पराक्रमी योद्ध्यापुरते मर्यादित ठेवणे ही एक मोठी बौद्धिक मर्यादा ठरेल. आधुनिक इतिहासलेखन, समाजशास्त्र आणि राज्यशास्त्र यांच्या दृष्टीने पाहिले असता शिवाजी महाराज हे एक राज्यसंस्थापक, लोककल्याणकारी प्रशासक, धर्मनिरपेक्ष दृष्टी असलेले नेतृत्व आणि भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक म्हणून समोर येतात. म्हणूनच १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ स्मृतिदिन नसून भारतीय राज्यसंस्थेच्या ऐतिहासिक मुळांचा पुनर्विचार करण्याची संधी आहे.

सतराव्या शतकातील भारताची राजकीय परिस्थिती अत्यंत अस्थिर होती. मुघल साम्राज्याचे केंद्रीकरण, दख्खनमधील आदिलशाही-कुतुबशाही यांचे संघर्ष, सरंजामी शोषण आणि धार्मिक-सामाजिक असुरक्षितता यांमुळे सामान्य जनता भयग्रस्त होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांचा उदय हा केवळ सत्तांतर नव्हता, तर राज्याच्या स्वरूपातच मूलभूत परिवर्तन घडवणारा होता. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही परकीय सत्तेविरोधातील प्रतिक्रिया नव्हे, तर स्वतःच्या लोकांसाठी स्वतःचे राज्य उभारण्याची सकारात्मक राजकीय दृष्टी होती.

इतिहासकार जदुनाथ सरकार, गोविंद सखाराम सरदेसाई, जेम्स लेन, स्टीवर्ट गॉर्डन यांसारख्या अभ्यासकांनी आपल्या लेखनात शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे विविध पैलू अधोरेखित केले आहेत. आधुनिक संशोधनानुसार, शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे लोकसंमतीवर आधारित, नैतिक अधिष्ठान असलेले आणि प्रशासकीय शिस्तीवर उभे असलेले राज्य होते. 'हे राज्य रयतेचे आहे' हा विचार केवळ घोषणात्मक नव्हता, तर महसूल व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संरक्षण धोरणांतून प्रत्यक्षात उतरवला गेला होता.

शिवाजी महाराजांच्या घडणीत जिजाऊ मातेचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. जिजाऊंच्या धार्मिक-नैतिक संस्कारांतून महाराजांमध्ये धर्मभावना निर्माण झाली, पण ती संकुचित नव्हती. रामायण-महाभारत, संत परंपरा आणि लोककथा यांमधून त्यांनी कर्तव्य, न्याय आणि लोकहित यांचे मूल्य आत्मसात केले. शहाजी राजांच्या अनुभवातून त्यांनी तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत समजून घेतली. त्यामुळे शिवाजी महाराजांचे नेतृत्व भावनिक नसून विवेकाधिष्ठित होते.

स्वराज्याची उभारणी करताना शिवाजी महाराजांनी स्थानिक शक्तींना संघटित केले. मावळ प्रदेशातील शेतकरी, स्थानिक सरदार, कारागीर आणि सामान्य सैनिक हे स्वराज्याचे आधारस्तंभ होते. ही प्रक्रिया आधुनिक राज्यशास्त्रात सांगितल्या जाणाऱ्या सहभागी शासन संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यामुळेच स्वराज्याला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला. लोकांनी ते आपले राज्य मानले, हीच त्याच्या यशाची गुरुकिल्ली ठरली.

लष्करी दृष्टिकोनातून पाहिले असता, शिवाजी महाराजांनी स्वीकारलेली गनिमी काव्याची रणनीती ही केवळ युद्धतंत्र नव्हती, तर ती संसाधन-मर्यादेतून निर्माण झालेली बुद्धिमान रणनिती होती. भूगोलाचा अचूक वापर, वेग, गोपनीयता आणि स्थानिक पाठिंबा यांच्या जोरावर त्यांनी बलाढ्य सैन्यांना पराभूत केले. मात्र महत्त्वाचे म्हणजे, युद्धातील नैतिकता त्यांनी कधीही सोडली नाही. स्त्रिया, मुले, वृद्ध आणि धर्मस्थळे यांना अभय देण्याची त्यांची भूमिका आधुनिक आंतरराष्ट्रीय मानवीय कायद्यांच्या तत्त्वांशी सुसंगत वाटते.

शिवाजी महाराजांचे प्रशासन हा त्यांच्या अभ्यासाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून त्यांनी कारभाराचे विकेंद्रीकरण केले. पंतप्रधान, अमात्य, सुमंत, सचिव, सेनापती, न्यायाधीश, पंडितराव यांसारखी पदे निर्माण करून त्यांनी कार्यविभागणी व उत्तरदायित्व निश्चित केले. महसूल व्यवस्था शेतकरीकेंद्रित होती. जमिनीचे मोजमाप, पीकपद्धतीनुसार कर आकारणी आणि आपत्तीच्या काळात सवलती देणे ही धोरणे लोककल्याणकारी राज्याची लक्षणे मानली जातात.

धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या काळात धमार्धारित संघर्ष सामान्य होते, तरीही त्यांनी धार्मिक सहिष्णुतेची भूमिका घेतली. मशिदींचे संरक्षण, कुराणाचा सन्मान आणि मुस्लिम अधिकाऱ्यांना महत्त्वाची पदे देणे यावरून त्यांची भूमिका स्पष्ट होते. त्यामुळे शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे धर्माधिष्ठित नसून नैतिक अधिष्ठान असलेले राज्य होते, असे आधुनिक इतिहासलेखन मानते.

स्त्रीसन्मानाच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन त्यांच्या काळाच्या खूप पुढचा होता. इतिहासकारांच्या नोंदींनुसार, स्त्रीवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत असे. युद्धात जिंकलेल्या स्त्रियांना सन्मानाने परत पाठवले जाई. ही भूमिका तत्कालीन सामंती मानसिकतेच्या पूर्ण विरोधात होती. त्यामुळे शिवाजी महाराजांना स्त्रीसन्मानाचे आद्य पुरस्कर्ते मानले जाते.



राज्याभिषेक हा शिवाजी महाराजांच्या जीवनातील एक निर्णायक टप्पा होता. तो केवळ धार्मिक विधी नव्हता, तर सार्वभौम भारतीय राज्याची औपचारिक घोषणा होती. परकीय सत्तांच्या छायेतून बाहेर पडून स्वराज्याला वैधता देणारा हा क्षण होता. राज्याभिषेकानंतर स्वराज्याची प्रशासकीय रचना अधिक सुसंगत आणि संस्थात्मक झाली.

शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे आकलन केवळ युद्ध आणि प्रशासनापुरते मर्यादित ठेवणे अपुरे ठरेल. त्यांच्या राज्यकारभाराचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे कूटनीती. सतराव्या शतकातील भारतीय राजकारण हे सतत बदलणाऱ्या सत्ता-समीकरणांनी व्यापलेले होते. मुघल, आदिलशाही, कुतुबशाही, स्थानिक सरदार आणि परकीय व्यापारी शक्ती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे होते. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांनी संघर्ष, तह, संधी आणि प्रतिकार यांचा समतोल साधत स्वराज्याचे हित जपले. आधुनिक आंतरराष्ट्रीय संबंध सिद्धांतात ज्याला 'रियलपोलिटिक' म्हटले जाते, त्याचे आद्य स्वरूप त्यांच्या धोरणांत आढळते.

महाराजांनी शत्रूशीही गरज पडल्यास तह केले, परंतु स्वराज्याच्या स्वायत्ततेवर कधीही तडजोड केली नाही. आग्रा भेटीसारख्या प्रसंगात त्यांची राजकीय सूक्ष्मदृष्टी आणि मानसिक धैर्य स्पष्टपणे दिसून येते. इतिहासकारांच्या मते, आग्र्यातील कैदेतून सुटका ही केवळ धाडसी पलायन नव्हते, तर मुघल सत्तेच्या नैतिक व राजकीय मर्यादांचे भान देणारा प्रसंग होता. या घटनेनंतर शिवाजी महाराजांची प्रतिमा केवळ प्रादेशिक राजापेक्षा व्यापक बनली.

मराठा साम्राज्याचा विस्तार हा शिवाजी महाराजांच्या वैचारिक वारशाचा परिणाम होता. त्यांनी निर्माण केलेली प्रशासनिक चौकट, लष्करी शिस्त आणि लोकाभिमुख धोरणे यांमुळे पुढील पिढ्यांना साम्राज्य विस्ताराची दिशा मिळाली. छत्रपती संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि पुढे पेशवाई काळातील नेतृत्वाने शिवाजी महाराजांच्या संकल्पनांना पुढे नेले. तथापि, इतिहासकार हेही अधोरेखित करतात की शिवाजी महाराजांचे वैयक्तिक नेतृत्व आणि नैतिक अधिष्ठान हे अद्वितीय होते, ज्याची पुनरावृत्ती पुढील काळात तशीच्या तशी झाली नाही.

ब्रिटिश कालखंडात शिवाजी महाराजांची प्रतिमा नव्याने घडवली गेली. औपनिवेशिक इतिहासलेखनात सुरुवातीला त्यांना 'बंडखोर सरदार' म्हणून दाखवण्याचा प्रयत्न झाला. मात्र भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी या दृष्टिकोनाला आव्हान दिले. लोकमान्य टिळकांनी शिवाजी जयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिक करून शिवाजी महाराजांना राष्ट्रीय प्रेरणास्थान बनवले. विनायक दामोदर सावरकर, महात्मा फुले, राजाराम मोहन रॉय यांसारख्या विचारवंतांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यसंकल्पनेला आधुनिक स्वातंत्र्य चळवळीशी जोडले.

आधुनिक भारतीय राष्ट्रवादाच्या अभ्यासात शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरती मर्यादित नव्हती, तर ती सांस्कृतिक, सामाजिक आणि नैतिक स्वातंत्र्याशी जोडलेली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील लढ्यात 'स्वराज्य' हा शब्द पुन्हा केंद्रस्थानी आला, याचे मूळ शिवाजी महाराजांच्या विचारांत आढळते. त्यामुळेच त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रतीक मानले जाते.

शिवाजी महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन आधुनिक भारतासाठी विशेष संदर्भात्मक ठरतो. आजच्या बहुधर्मीय, बहुसांस्कृतिक समाजात धार्मिक सहिष्णुता आणि परस्पर आदर ही मूल्ये अत्यंत आवश्यक आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवली. त्यांच्या काळातील राजकीय वास्तव पाहता ही भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते. म्हणूनच आधुनिक राज्यशास्त्रात त्यांना 'सर्वसमावेशक शासक' म्हणून पाहिले जाते.

स्त्रीसन्मानाच्या संदर्भात शिवाजी महाराजांचे विचार आजच्या लिंगसमतेच्या चर्चेतही मार्गदर्शक ठरतात. स्त्रीला केवळ संरक्षण नव्हे, तर सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक परिवर्तनाची बीजे पेरणारी होती. आधुनिक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, शिवाजी महाराजांची भूमिका ही तत्कालीन पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीत राहूनही प्रगत होती.

प्रशासनशास्त्राच्या दृष्टीने शिवाजी महाराजांचे राज्य हे कल्याणकारी राज्याच्या प्राथमिक संकल्पनेशी सुसंगत वाटते. महसूल सवलती, आपत्ती व्यवस्थापन, न्याय्य करप्रणाली आणि लोकाभिमुख न्यायव्यवस्था ही वैशिष्ट्ये आधुनिक कल्याणकारी राज्याच्या मूलतत्त्वांशी जुळणारी आहेत. त्यामुळे शिवाजी महाराजांचे राज्य हे केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सैद्धांतिक अभ्यासासाठीही महत्त्वाचे ठरते.

आजच्या भारतात शिवाजी महाराजांचे स्मरण अनेकदा भावनिक किंवा राजकीय पातळीवर मर्यादित राहते. मात्र शैक्षणिक दृष्टीने पाहिले असता त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. अभ्यासक्रम, संशोधन आणि सार्वजनिक चर्चांमध्ये शिवाजी महाराजांना केवळ योद्धा म्हणून नव्हे, तर राज्यसंस्थापक, प्रशासक आणि सामाजिक सुधारक म्हणून मांडणे आवश्यक आहे. यामुळे इतिहासाचे अधिक समतोल आणि वैज्ञानिक आकलन विकसित होईल.

जागतिक इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, शिवाजी महाराजांची तुलना युरोपमधील राष्ट्रनिर्मात्यांशी करता येते. त्यांनी उभारलेले स्वराज्य हे स्थानिक परिस्थितीतून उगम पावलेले असले तरी त्यातील मूल्ये सार्वकालिक आहेत. स्वातंत्र्य, न्याय, लोककल्याण आणि नैतिक नेतृत्व ही मूल्ये कोणत्याही काळात आणि कोणत्याही समाजात उपयुक्त ठरतात.

समारोप करताना असे म्हणता येईल की छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठा इतिहासाचे नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाचे केंद्रीय व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांच्या स्वराज्याची संकल्पना ही आधुनिक भारतीय राज्यव्यवस्थेची वैचारिक पूर्वपीठिका ठरते. १९ फेब्रुवारी रोजी साजरी होणारी शिवजयंती ही केवळ गौरवाचा उत्सव नसून आत्मपरीक्षणाची संधी आहे. त्यांच्या विचारांकडे केवळ अभिमानाने नव्हे, तर अभ्यासपूर्ण दृष्टीने पाहिले तरच आपण त्यांच्या वारशाशी प्रामाणिक राहू शकतो. शिवाजी महाराजांचा वारसा म्हणजे तलवारीचा नव्हे, तर विचारांचा; सत्तेचा नव्हे, तर सेवेचा; विजयाचा नव्हे, तर मूल्यांचा वारसा आहे. आधुनिक भारताच्या लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांत त्यांच्या स्वराज्याचा प्रतिध्वनी ऐकू येतो. म्हणूनच शिवाजी महाराज इतिहासात बंदिस्त न राहता आजही वर्तमानाशी संवाद साधतात आणि भविष्याला दिशा देतात.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

## संत रोहिदास महाराज हे समतेचे, भक्तीचे आणि समाजसुधारणेचे प्रभावी संत होते - हभप विकास महाराज गोसावी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** संत रोहिदास महाराज (रविदास) हे भक्ती चळवळीतील महान संत-कवी होते.त्यांचा जन्म साधारण १५व्या शतकात काशी (वाराणसी) येथे झाला. ते चर्मकार (चांभार) समाजातून होते. त्यांनी आपल्या आयुष्यातून समता, मानवता आणि भक्ती यांचा संदेश दिला.त्यांनी सांगितलं की देवभक्तीसाठी जात-पात, उच्च-नीच काहीच महत्त्वाचं नाही .मन शुद्ध आणि प्रेम भाव असणं महत्त्वाचं. संत रोहिदास महाराज हे समतेचे, भक्तीचे आणि समाजसुधारणेचे प्रभावी संत होते असे प्रतिपादन हभप विकास महाराज गोसावी यांनी केले आहे.

कन्हेरगांव तालुका माढा येथे श्री संत रोहिदास महाराज



यांच्या जयंतीनिमित्त किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हभप विकास महाराज गोसावी बोलत होते.

हाचि नेम आतां न फिरें माघारी
बैसलें शेजारीं गोविंदाचे
घररिघी झालें पट्टराणी बळें
वरीलें सांवळें परब्रह्म
बळियाचा अंगसंग झाला आतां
नाहीं भय चिंता तुका म्हणे

या अभंगाचे विवेचन करताना महाराजांनी सांगितले की, देवाशी नातं जडलं की भक्त मागे फिरत नाही; भक्तीमुळे कृष्णाचा सहवास मिळतो आणि मग भीती-चिंता संपते.म्हणजे भक्तीचा निर्णय पक्का झाला आहे; संसाराकडे परत वळायचं नाही. अंतःकरणात भक्तीची ताकद आली आणि देवाशी नातं जडलं जाते,आता त्या बलवान देवाचा मला सहवास मिळाला आहे; म्हणून मला भीती, चिंता काहीच उरलेली नाही,ह्व देवाजवळ गेल्यावर मन निश्चिंत होतं असे मत हभप विकास महाराज गोसावी यांनी केले आहे.

यावेळी उपसरपंच लिंबाजी मोरे, सरपंच श्रीकांत बनसोडे, कन्हेरगांवचे माजी उपसरपंच धनंजय मोरे, ज्योतीराम कांबळे, हभप नामदेव महाराज शिंदे, अमोल मोरे, मृदुंगाचार्य हनुमंत केंगार, सदस्य गणेश माने, विष्णू मोरे, जयराम डोके, गणेश शिंदे, श्रीमंत पाटील, केशव डोके, शिवदास पाटील, जालिंदर डोके, नागनाथ भगत, नागनाथ डोके, बळीराम शिंदे, विकी मोरे, तुकाराम केदार, राजेंद्र डोके, दत्तात्रय पाटील, महादेव पाटील, भारत डोके, दत्तात्रय सुतार, सुभाष गायकवाड, वामन लोंढे, हनुमंत भाग्यवंत, यल्लाप्पा सोनवणे, तुकाराम शिंदे, राजेंद्र शिंदे, रवींद्र शिंदे, मारुती मोकाशी, देविदास जाधव, नवनाथ सोनवणे, संजय सुतार,आबा धुमाळ यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त पुणे विभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या वतीने 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमांतर्गत पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांमध्ये विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली आहे. या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असेही आवाहन त्यांनी केले आहे.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी दिलेले अभूतपूर्व बलिदान आणि त्यांचे विचार जनसामान्यांपर्यंत, विशेषतः तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे हा या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे. पुणे विभागातील पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या पाचही जिल्ह्यात शैक्षणिक उपक्रम, आरोग्य पंधरवडा, स्वच्छता व जनजागृती तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम आदींचे आयोजन करण्याच्या सूचना डॉ. पुलकुंडवार यांनी दिल्या आहेत.

याअंतर्गत सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धा, प्रभात फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिद्ध गायक सतिंदर सरताज यांनी गायलेले भक्तीगीत शाळा आणि सार्वजनिक ठिकाणी ऐकवले जाणार आहे. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावरील माहितीपट शाळा व सार्वजनिक ठिकाणी दाखवले जाणार आहेत. शाळा, महाविद्यालये आणि संस्थांनी त्यांच्या उपक्रमांची माहिती आणि जिओ टॅग केलेले फोटो शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://gurutegbahadurshahidi.com अपलोड करणे आवश्यक आहे.

१० फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण विभागात 'आरोग्य पंधरवडा' राबवला जात असून, ठिकठिकाणी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली आहेत. ग्रामपंचायत आणि नगरपालिका क्षेत्रांत विशेष स्वच्छता मोहिमा, प्रभात फेऱ्या आणि विशेष ग्रामसभांच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे.

### पान १ वरून

## पोस्ट आधी, घटना नंतर!...

दिली, असा दावा त्यांनी केला. 'तांत्रिक एजन्सी असूनही विमानाच्या मॉडेलमध्ये गोंधळ कसा होतो?' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**इंजिन तासांबाबत संशय**

विमानाच्या इंजिनची उड्डाणक्षमता ५००० तासांची असल्याचे सांगितले जात असताना ते ४९१५ तास उडाले होते, असे पवार म्हणाले. 'प्रत्यक्षात हे इंजिन ८००० तासांपर्यंत वापरले गेले असावे,' असा दावा करत त्यांनी इंजिन निमार्ता Honeywe'' कंपनीकडून अधिकृत माहिती जाहीर करण्याची मागणी केली.

**कंपनी मालक परदेशात?**

अपघातानंतर संबंधित कंपनीचा मालक रोहित सिंग परदेशात गेल्याचा दावा पवार यांनी केला. 'मालक भारतात नसताना तपास कसा होणार? त्याला बाहेर जाण्यास कोणी मदत केली?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, कंपनीविरोधात कारवाई का होत नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

**प्राथमिक अहवाल प्रलंबित**

२ फेब्रुवारी रोजी चौकशीचे आदेश देण्यात आले होते. १५ फेब्रुवारीपर्यंत प्राथमिक अहवाल अपेक्षित होता; मात्र तो अद्याप जाहीर झालेला नाही. 'तपासाचा वेग मंद आहे. त्यामुळे जनतेच्या मनात संशय वाढतो आहे,' असे पवार म्हणाले.

एकूणच, रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत इंजिन स्थिती, अतिरिक्त इंधन, विमा रक्कम, पायलटची भूमिका, ब्लॅक बॉक्सची स्थिती आणि कंपनी व्यवस्थापन या सर्व बाबींवर सविस्तर प्रश्न उपस्थित करत स्वतंत्र व निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. दरम्यान, अधिकृत तपास अहवालानंतरच अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

## सोलापूर महापालिका हद्दीतील सर्व मद्य विक्री दुकाने बंदचे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती उत्सवानिमित्त सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियमातील कलम १४२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व अबकारी अनुज्ञप्त्या दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी पूर्ण दिवस बंद राहतील. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

## 'शिवजन्मोत्सवाचा उत्साह...

**यांच्या हस्ते झाला पाळणा सोहळा**

सोलापूर जिल्ह्यातील वीरपत्नी देवकी रत्नाकर हडपद रेखा शावरेप्पा नावी, रत्नाबाई बाबुराव चांदोडे, सुषमा दत्तात्रय माने, यांच्यासह महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शहरातील शिवकन्या संजीवनी ज्योतीराम भोजने, सरोजिनी ज्योतीराम भोजने, अमृता ब्रह्मदेव ननवरे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील, सोलापूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त विना पवार, श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या ट्रस्टी सुषमाताई मुरलीधर घाडगे, यशोदा ताई अर्जुनराव सुरवसे, सीताबाई धर्माजी भोसले लतात ताई विजयराव फुटाणे सरोजिनीताई शिवाजीराव घाडगे मंगलताई दिलीप कोल्हे आधी जास्त पाळणा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाकरिता श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे उपाध्यक्ष श्रीकांत डांगे कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे ट्रस्ट सचिव प्रीतम परदेशी ट्रस्टी खजिनदार जयवंत शेळके सदस्य शिवाजीराव गाडगे गुरुजी दिलीप कोल्हे पुरुषोत्तम बर्डे राजन जाधव नागेश टाकमोगे महादेव गवळी विनोद भोसले, प्रभाकर रोडगे विक्रांत वानकर ज्ञानेश्वर सपाटे अनिकेत पिसे विवेक फुटाणे बजरंग जाधव प्रकाश ननवरे अमोल केकडे शिवकुमार कामाठी देविदास घुले आधी जर उपस्थित होते.

यंदाचे उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, कार्याध्यक्ष उत्तरा बरडे - बचुटे, कृष्णा सुरवसे, अनिरुद्ध पाटील, नामदेव पवार, रमेश जाधव, किरण भंडारी, संतोष जाधव, ब्रह्मदेव पवार, संजीवनी मुळे, चारुशीला जगदाळे, पुरुषोत्तम बोबडे, अंबादास सपकाळ, संदीप काशीद, सुजित चौगुले, विजय पुकाळे, लक्ष्मण भोसले, दीपक शेळके कृष्णकांत चव्हाण, प्रभाकर जाधव, प्रभाकर भोजरंगे, जलपेश घुले, रामदादा सुरवसे, बाबा बनसोडे, सचिन स्वामी, बबलू जांभळे, नागेश वडणे, तुषार गायकवाड, कृष्णा भुरळे यांनी या पाळणासोळ्याचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

### वात्रटिका

**राजे माफ करा...**

आज चरणी तुज्या राजा
झुकतील आणि वाकतील...
वेळ बघून फोटो आणि नाव
पुन्हा तुझाच ते वापरतील...
शत्रू तू पाहिला आणि त्याची
तू चांगलीच जिरवलीआहे...
राजा, त्याहून नालायक पिढी
आज इथं जन्मलीआहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# AQI 155 पार; नागरिकांच्या श्वासावर संकट



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर व परिसरातील सतत खोदलेले रस्ते, उद्योग व वाहनांमधून मोठ्या प्रमाणावर होणारा धूर, रस्त्याच्या कडेला उघड्यावर पडलेला कचरा तसेच सार्वजनिक मैदाने व कच्च्या रस्त्यांवर पाणी न मारल्याने हवेत धुळीचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. परिणामी शहरातील हवेची गुणवत्ता घसरत असून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

निरोगी जीवनासाठी शुद्ध हवा अत्यावश्यक असताना वाढत्या प्रदूषणामुळे शहरातील हवा दिवसेंदिवस अशुद्ध होत चालली आहे. शहरातील अनेक भागांत नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी वारंवार शिंकणे व खोकल्याचा त्रास जाणवत असून श्वसनासंबंधित तक्रारी वाढताना दिसत आहेत. त्यामुळे हवेच्या शुद्धतेसाठी तातडीने ठोस उपाययोजनांची गरज निर्माण झाली आहे.

तज्ज्ञांच्या मते, हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) 0 ते 50 दरम्यान असल्यास हवा स्वच्छ व सुरक्षित मानली जाते. मात्र सध्या शहरातील AQI 101 ते 155 दरम्यान नोंदवला जात असून हा स्तर आरोग्यास धोकादायक व त्रासदायक मानला जातो. या स्थितीमुळे दमा, धाप लागणे, ॲलर्जी व इतर श्वसनविकारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

शहरातील रस्ते वेळेवर दुरुस्त करणे, नियमित पाणी फवारणी करणे, कचरा व्यवस्थापन सुधारणा, औद्योगिक धूर नियंत्रण आणि वाहन प्रदूषणावर नियंत्रण यांसारख्या उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शुद्ध हवा मिळण्यासाठी प्रशासनाने प्रभावी पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सोलापूर मंगळवेढा महामार्गावर बेगमपूरजवळ पिकअप आणि दुचाकीची धडक, एकाचा जागीच मृत्यू



**कामती (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर-मंगळवेढा महामार्गावर भरधाव पिकअपने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. हा अपघात मंगळवारी रात्री सुमारे आठच्या सुमारास बेगमपूर (ता. मोहोळ) गावाजवळ घडला. धडकेनंतर दुचाकी काही अंतर फरफटत गेल्याने अपघाताची तीव्रता वाढली.

या अपघातात बोराळे (ता. मंगळवेढा) येथील योगेश प्रकाश शहा (वय ३५) यांचा जागीच मृत्यू झाला, तर चंद्रकांत चन्नगोंडा पाटील (वय ६०) हे गंभीर जखमी झाले आहेत. दोघेही कामानिमित्त दुचाकीवरून बेगमपूरकडे गेले होते आणि काम आटोपून गावी परतत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला.

घटनेची माहिती मिळताच कामती पोलिस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच योगेश शहा यांचा मृत्यू झाला. चंद्रकांत पाटील यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, अपघातातील पिकअप वाहनाचा क्रमांक एमएच ४५ एएक्स ४५१९ असून दुचाकीचा क्रमांक एमएच १२ डब्लूएम ८४४४ आहे. अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी सुमारे अर्धा तास महामार्ग रोखून धरला. वारंवार अपघात होत असल्याने रस्ते सुरक्षेच्या उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. पोलिसांनी ग्रामस्थांशी चर्चा करून वाहतूक सुरळीत केली.

# शिवरत्न शिक्षण संस्थेच्या वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शिवरत्न शिक्षण संस्था संचलित सीबीएससी स्कूल हमोर्नीच्या 2025-26 वर्षाचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच उत्साहात पार पडले. या खास प्रसंगी मराठी सिनेसृष्टीतील अभिनेत्री उर्मिला कानिटकर कोठारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी रंगभूमीवर उत्कृष्ट नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकले, ज्याबद्दल उर्मिला कानिटकर यांनी त्यांच्या कलेचे कौतुक केले. तसेच, वर्षभरातील शैक्षणिक, क्रीडा आणि सर्वांगीण कामगिरीसाठी विविध पुरस्कारांचे व बक्षीस वितरण करण्यात आले. यामध्ये वर्षभरातील उत्कृष्ट शैक्षणिक पुरस्कार, उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार तसेच क्रीडा क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

स्नेहसंमेलनात कार्यकारी अभियंता सुनीता पाटील, संस्थेच्या अध्यक्ष शितलदेवी मोहिते पाटील, देवश्री मोहिते पाटील, इशिता मोहिते पाटील, सचिव धर्मराज दगडे, तसेच संचालक व प्रिन्सिपल अल्बर्ट थकरन यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शिवरत्न शिक्षण संस्थेने शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला आहे, सदर कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरण संपन्न झाला.

# शिवजयंती दिनी 'मेरा युवा भारत' मेगा पदयात्रेचे आयोजन

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण राज्यभरात 'माय भारत' (मेरा युवा भारत) मेगा पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी त्याबाबत काटेकोर नियोजन करून उपक्रम यशस्वी करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले की, भारत सरकारचे युवक व क्रीडा मंत्रालय आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शिवजयंतीनिमित्त या पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, शिक्षण विभाग तसेच आरोग्य विभागासह अन्य सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने तयारी करून हा उपक्रम यशस्वी करावा. विभागात सर्व जिल्ह्यात पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून मुख्य कार्यक्रम सातारा येथे आयोजित करण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले, या पदयात्रेमध्ये अधिकाधिक विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी शिक्षण विभागाने शैक्षणिक संस्थांशी तात्काळ समन्वय साधून नियोजन करावे. पदयात्रेत अधिकाधिक लोकप्रतिनिधी, विविध शासकीय अधिकारी, महिला, युवक आदी सहभागी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट आणि गाईड आदीमधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सकाळी लवकर पदयात्रा आयोजित करावी. मार्गावर आवश्यक तेथे पाण्याची, आरोग्य तपासणी, उपचारासाठी वैद्यकीय पथके, पुरेशा रुग्णवाहिका आदींची व्यवस्था करावी. लहान मुले येणार असतील तर त्यांची विशेष काळजी घ्यावी. आजारी मुले सहभागी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

आयोजित पदयात्रा ही केवळ औपचारिक मिरवणूक न राहता ती तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारी, राष्ट्रप्रेम जागृत करणारी आणि स्वराज्याचा संदेश देणारी प्रेरणादायी चळवळ ठरावी, असेही डॉ. फुलकुंडवार यांनी सांगितले. पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचा आराखडा करून योग्य ती अंमलबजावणी करावी अशा सूचना विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. फुलारी यांनी पोलीस दलाला दिल्या. केंद्र शासनाच्या युवक कल्याण विभागामार्फत 'MyBharat' पोर्टलद्वारे सहभागी होण्याचे युवकांना आवाहन करण्यात आले आहे. पुणे विभागात पारंपारिक वेशभूषेत, ढोल-ताशा पथकांच्या गजरात आणि महाराजांच्या जयघोषात पदयात्रा काढण्यात येणार आहेत.

# छत्रपती शिवाजी प्रशाला येथे पुरातन शस्त्र पाहण्यास प्रचंड गर्दी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाज सेवा मंडळ छत्रपती शिवाजी प्रशाला येथील शिवमुतीर्ची प्रतिष्ठापना करण्यात आली. शस्त्र आणि पुरातन नाण्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते शिवमुतीर्ची पूजन व प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी प्रशालेच्या आवारात भरविण्यात आलेल्या या प्रदर्शनात पुरातन शस्त्रे पुरातन शस्त्रे व पुरातन नाणी ठेवण्यात आले आहेत. इतिहासाला उजळणी मिळवी यासाठी प्रदर्शन भरविण्यात आल्याचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांनी सांगितले. यावेळी महापौर विनायक कोंड्याल म्हणाले की इतिहासाची जपवणूक व संवर्धन करण्यासाठी जुन्या काळातील शस्त्र व नाणी यांचे प्रदर्शन भरवण्याची आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य व दूरदृष्टी, राष्ट्रभक्ती ही प्रत्येकांसाठी प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी इतिहासातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी काम करावे.यावेळी ज्ञानेश्वर सपाटे,महादेव गवळी, विनायकराव पाटील,प्रभाकर खंडाळकर,सुरेश पवार, मुकुंद जाधव,नागेश हावळे, शिवदास चटके, अशोक चव्हाण,राजेंद्र शिंदे,प्राचार्य नितीन मोटे,प्रा.युवराज सुरवसे दत्ता भोसले, अलका सुरवसे,सुजाता जुगदार मंजुश्री पाटील सूत्रसंचालन सारिका महामुनी यांनी केले. तर आभार महेश माने यांनी मानले.यावेळी कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर विद्यार्थी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सोलापुरात पदयात्रेचे आयोजन

**चार हुतात्मा पुतळा ते शिवाजी महाराज उद्यान पर्यंत पदयात्रा निघणार**

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रालयामार्फत ( "MY Bharat" (Mera Yuva Bharat) मेगा पदयात्रेचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रात करण्यात आले आहे. सोलापूर जिल्हा प्रशासनातर्फे गुरुवार, दिनांक 19 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.00 वाजता मेगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही पदयात्रा चार हुतात्मा पुतळा ते शिवाजी महाराज उद्यान येथपर्यंत जाणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली.

"पदयात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे:- चार हुतात्मा पुतळा, डफरीन चौक, हरिभाई देवकरण प्रशाला, पंचायत समिती उत्तर सोलापूर कार्यालय व शिवाजी महाराज उद्यान

तर जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांनी तसेच त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांनी पारंपारिक वेशभूषेत पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी पाटील यांनी दिले आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमास उत्साहात सुरुवात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महसूल व वनविभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून सांस्कृतिक कार्यक्रमाचा शुभारंभ केला.

यावेळी उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कलाकारांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाट्य कार्यक्रमातून शिवाजी महाराजांच्या जाज्वल अशा इतिहासाचे सादरीकरण नागरिकांसमोर केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंगाचे सादरीकरण पहात असताना त्या काळातील इतिहास डोळ्यासमोर येत होता. शिवाजी महाराजांच्या शौर्य गाथातून हिंदवी स्वराज्य कसे निर्माण झाले तसेच त्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवलेले शौर्य तसेच शासन करत असताना गोरगरीब जनतेला न्याय देण्याची भूमिका, जाणता राजा अशा सर्व ऐतिहासिक पैलूंचे सादरीकरण नाट्याच्या माध्यमातून प्रेक्षका समोर सादर करण्यात आले.

# रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांनी धर्माचे रक्षण केले - कीर्तनकार शितलताई साबळे-पाटील



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज शिवाचा अवतार होते.राजमाता जिजाऊंनी शिवाजी महाराजांना घडविले. त्याच संस्काराची शिदोरी घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी आई आणि रयतेसाठी स्वराज्य निर्माण केले. आईच्या दुधाची पर्वा फक्त आणि फक्त शिवाजी महाराजांनीच केली. छत्रपती शिवाजी महाराज स्त्री नाचवणारे नव्हते तर स्त्री वाचवणारे राजे होते. शिवरायांनी धमार्चे रक्षण केले,असे सांगत हिंदू म्हणून जन्माला आल्याचा अभिमान आणि स्वाभिमान सर्वांना असला पाहिजे,असे विचार राहुरी येथीललोकप्रिय कीर्तनकार कु.शितलताई साबळे - पाटील यांनी मांडले.

आई वडिलांशी प्रेमाने वागा,कौटुंबिक नात्याला तडा जाणार नाही याची पुरेपूर काळजी घेण्याबरोबरच नातेसंबंध जपा,हेच आपले संस्कार, संस्कृती आणि संपत्ती असल्याचे शितलताईंनी यावेळी बोलताना सांगितले.

गवळी वस्ती तालीम संघ सार्वजनिक शिवजन्मोत्सव व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने मंगळवारी सायंकाळी दमानी नगर येथील ह.भ.प. आप्पाराव सवाळकर उद्यानात लोकप्रिय कीर्तनकार ह. भ. प. कु. शितललाई साबळे - पाटील यांचा कीर्तन सोहळा अयोजित करण्यात आला होता.यावेळी कीर्तनकार शितलताई साबळे - पाटील यांनी विनोदी कीर्तनाच्या माध्यमातून श्रोत्यांना खळखळून हसवले. कीर्तनातील विनोदी शैली आणि सामाजिक विषयांवरील मांडणीमुळे त्यांच्या कीर्तनाला श्रोत्यांनी भरभरून दाद दिली.

मुलांवर चांगले संसकृ करा. आईचे उपकार कधीच विसरू नका.आई म्हणजे प्रेमाचा अथांग सागर आणि निःस्वार्थ आशीवार्दाची मूर्ती होय. आई देवाची प्रचिती देते आणि कोणत्याही अपेक्षाशिवाय मुलांवर माया करते. आई वडील हेच खरे दैवत असून त्यांच्या प्रेमाची सर कशालाच येत नाही. प्रत्येक चूक सुधारण्यासाठी आई-वडीलच पाहिजेत. आयुष्य जगण्याची ट्रेनिंग आई-वडील देतात म्हणून तर आयुष्य जगता येते .माणसाला कठीण काळात सकारात्मक राहण्याची आणि यशाच्या दिशेने वाटचाल करण्याची ऊर्जा आई-वडीलच देतात. आई-वडिलांच्या प्रेम आणि मायेचे उपकार जगातील कोणताही मुलगा किंवा मुलगी फेडू शकत नाही. तरुणपणात आईवडिलांचे एटीएम कार्ड तर म्हातारपणात आईवडिलांचे आधार कार्ड बना असा सल्लाही त्यांनी यावेळी बोलताना दिला. घराघरातील वातावरण चांगले राहण्यासाठी आई-वडिलांशी प्रेमाने वागा, मुला-मुलींनी आई-वडिलांची माया जपली पाहिजे.मुलामुलींनी आईवडिलांची मान खाली जाणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. प्रेम, आपुलकी, जिव्हाळा आणि काळजी असेल तरच नाते टिकते. असे सांगत कीर्तनकार शितलताई साबळे - पाटील यांनी विनोदी उदाहरणे देत अनेकांना खिळवून ठेवले.

स्वतःवर विश्वास ठेवा, मोठी स्वप्न पहा आणि ती सत्यात उतरण्यासाठी कठोर मेहनत करा, हाच खरा यशाचा मंत्र आहे. आव्हानांना संधी म्हणून लढणे आणि हार न मानता प्रयत्न करणे यातूनच जीवन सार्थकी लागते. यशस्वी लोक संधी शोधत नाहीत, तर ते स्वतः संधी निर्माण करतात,असेहि शितलताई यावेळी बोलताना म्हणाल्या. कु. शितलताई साबळे - पाटील यांच्या सुश्राव्य व विनोदी कीर्तनाचा लाभ हजारो श्रोत्यांनी लाभ घेतला.

ह. भ. प. प्रभाकर महाराज वाघचौरे यांच्या संत तुकाराम महाराज वारकरी प्रशिक्षण संस्थेतील वारकऱ्यांची या कीर्तन सोहळयाला साथ संगतकेली .तर औंढी येथील हनुमान भजनी मंडळ,गवळी वस्ती विठ्ठल मंदिर भजनी मंडळ, न्यू लक्ष्मी चाळ भजनी मंडळ, जय बजरंग भजनी मंडळ गवळी वस्ती, आणि मुक्ताई मंदीर भजनी मंडळ यांचे या कीर्तन सोहळयासाठी सहकार्य लाभले.

प्रास्ताविकात नगरसेविका मृण्मयी गवळी यांनी गवळी वस्ती तालीम संघ सार्वजनिक शिवजन्मोत्सव व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने वर्षभर आयोजित केल्या जाणाऱ्या सामाजिक कायार्ची माहिती सांगितली.

यावेळी नगरसेविका मृण्मयी गवळी, सोनाली गायकवाड, मंडळाचे आधारस्तंभ महादेव गवळी, उत्सव अध्यक्ष सुनील कदम, चंद्रकांत पवार, औदुंबर जगताप, बाळासाहेब घुले, वामन वाघचौरे, अरुंधती महाराज गवळी, ईश्वर अहिरे, लहू गायकवाड, शेखर कवठेकर, संदीप काशीद, शाम गांगर्डे, विष्णू जगताप, प्रशांत भगरे, महेश चव्हाण, सुरज काशीद, विजय घुले, अरविंद गवळी, लखन कारंडे यांच्यासह श्रोतावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

